**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

**नागपूर शहर पोलीस आयुक्तालय**

**(पोलीस वार्तापत्र)**

**सकाळ**

---

**दिनांक २२.०६.२०२२ बुधवार**

**(गुन्हे)**

**१) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मु.दा.का अन्वये १० केसेस १० आरोपींना अटक करून रू १०,७०५/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०१ केसेस ०१ आरोपींना अटक करून रू ९०४०/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण २,५६४ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क रू ५,१५,९००/— वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) पो.स्टे. सदर — पळवून नेणे:**

दिनांक २०.०६.२०२२ चे १९:०० वा. चे सुमारास पो.स्टे. सदर हद्दीत राहणाऱ्या ४५ वर्षीय फिर्यादी यांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी कोणाला काहीही न सांगता घरुन निघुन गेली. परत आली नाही. शोध घेतला असता मिळुन आला नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायलयाचे निर्देशान्वये पो.स्टे. सदर येथे सपोनि चोपडे, ९८२३१६२८२४ यांनी आरोपी विरूध्द कलम ३६३ भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**(इतर)**

**१) पो.स्टे. वाठोडा यांची कामगीरी :—**

दिनांक ११.०६.२०२२ ते १३.०६.२०२२ दरम्यान नरेंद्र भालचंद्र खानोरकर वय ३१ वर्ष रा. प्लॉट नं २३ बी शक्तीमाता नगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी यांची पो.स्टे. वाठोडा हद्दीत प्लॉट नं. १३ ऑरेंज नगर, नागपूर येथे भारत फायनंसियल इंक्युजन लिमीटेड या नावाने कार्यालय आहे. कोणीतरी अज्ञात चोराने कार्यालयाचे शटर वरती करून आत प्रवेश करून ड्रॉवर मधुन नगदी रोख रक्कम ७,१८,६७६/—रू व ९६ पानाचे चेकबुक चोरून नेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. वाठोडा येथे आरोपी विरूध्द कलम ४५४,४५७,३८० भादवि अन्वये गुन्हा नोंदविला होता.

वाठोडा पोलीसांनी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषनाचे आधारे गुन्हा उघडकिस आणुन यातील आरोपी १) ताशुक अल्ताफ शेख वय २३ वर्षे रा. हिवरी ले आउट मस्जीद ए अक्सा नंदनवन नागपुर २) आकाश राधेशाम नागरीकर वय २३ वर्षे रा. भांडेवाडी जय दुर्गा नगर नागोबा मंदीराजवळ पोलीस ठाणे पारडी नागपुर शहर ३) जय भिमराव गजभिये वय २० वर्ष. रा.

न्यु पॅथर नगर नंदनवन ४) शुभम विनायक चुनोडे वय २६ वर्ष. रा. तुळशी नगर प्लॉट नं ३२ बोभाटे आटा चक्की जवळ पो.स्टे वाठोडा नागपुर शहर यांना अटक केली. आरोपींचा दिनांक २२/०६/२०२२ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड प्राप्त केला आहे. आरोपींचे ताब्यातुन १) रोख रक्कम २,४७,००० रूपये २)गुन्हयात वापरलेली वाहने १) होंडा कंपनीची डिओ गाडी एमएच ४९बीए ३०५५ किं. अं. ५०,००० रू. २)स्प्लेंडर वाहन क्र. एमएच ४९ बीएस ९०८८ किं.अं. ५०,००० रू.३)गुन्हा करताना वापरलेले मोबाईल १) विवो कंपनीचा मोबाईल किंअं. १०,००० रू. २) मायक्रोमॅक्स कंपनीचा मोबाईल किंअं. ३००० रू ३)रेडमी कंपनीचा मोबाईल किं.अं. १०,०००रू. ४)आसुस कंपनीचा मोबाईल किं.अं. १०,०००रू ५)ओपो कंपनीचा मोबाईल किं.अं. १०,००० रू. असा एकुण ३,९०,००० रूपयांचा मुदेमाल जप्त करण्यात आलेला आहे गुन्हयाचा तपास सुरू आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस उप आयुक्त परि. क्रं. ४ श्री. नुरूल हसन मा. सहा. पोलीस आयुक्त सक्करदरा विभाग श्री.पुडंलिक भटकर, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक आशालता खापरे, पोलीस निरीक्षक श्री. हरिषकुमार बोराडे, सपोनि हेमंत थोरात, सफौ विजय, नापोअं राजेश, अश्विन, अतूल, विष्णु, दिपक तरेकर, पोअं चेतन, मंगेश, पवन, मिलीद प्रफूल्ल यांनी केली.



(राहुल डोंगरे)
सहा.पोलीस निरीक्षक
पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर